**साक्षीदाराचा पुरावा अकोट, जि. अकोला न्यायालयामधून व्हीडीओ कॉन्फरसींगव्दारे नोंदविण्यात आला.**

**अतिरिक्त सत्र न्यायाधीश यांचे न्यायालय,यवतमाळ**

**सत्र खटला क्र. ९७/२०२३**
**निशाणी क्र. ७०**

**महाराष्ट्र शासन** **सरकारी अभियोक्ता**
**..वि..**
**अजीत दुंडेकर** **आरोपी.**

| | |
|---|---|
| **शासन तर्फे साक्षीदार क्र. ५** | |
| मी याद्वारे शपथपूर्वक सांगतो की - | |
| माझे संपूर्ण नाव | किशोर बळीराम जुनघरे |
| वय अंदाजे ४३ वर्षे | धंदा- पोलीस निरीक्षक, पोलीस स्टेशन अकोल शहर, ता.अकोट जि. अकोला. |
| राहणार | अकोट ता. अकोट जि. अकोला. |
| **सरतपासणी श्री. यु. के. पांडे सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांचेमार्फत शपथेवर सुरुः-** | |

सन २०२१ मध्ये मी पोलीस स्टेशन यवतमाळ ग्रामिण येथे कार्यरत होतो. त्यावेळी गुन्हा क्रमांक ७२२/२०२१ चा तपास माझ्याकडे आला होता. तपासादरम्यान मी पंचनाम्यासाठी पंचाना सुचानापत्र दिले होते. त्याप्रमाणे मी घटनास्थळ जप्ती पंचनामा पंचासमक्ष तयार केला. मला आता तो पंचनामा दाखविण्यात आला, त्यावर माझी, पंचाची व आरोपींची सही आहे व त्यातील मजकूर बरोबर आहे व तो पंचनामा **निशाणी क्रमांक ७१** वर आहे. त्यानंतर अन्न व सुरक्षा अधिकारी, यवतमाळ यांना लेखी पत्र दिले. मला आता सदरचे पत्र दाखविण्यात आले. त्यावर माझी सही असून त्यातील मजकूर बरोबर आहे व ते पत्र **निशाणी क्रमांक ७२** वर आहे. त्यानंतर अन्न सुरक्षा अधिकारी श्री दंदे यांनी पोलीस स्टेशनमध्ये कैफियत दिली व त्या कैफियत मध्ये नमूद असलेले दस्तऐवज त्यांनी मला दिले. त्यानंतर मी गुन्हा नोंदविला. त्यानंतर मी आरोपींना अटक केली. मला आता आरोपीचे अटक फॉर्म दाखविण्यात आले, त्यावर माझी व आरोपींची सही असून त्यातील मजकूर बरोबर आहे व ते अटक फॉर्म **निशाणी क्रमांक ७३ ते ७५** वर आहे. त्यानंतर मी सर्व साक्षीदारांची बयाणे नोंदविली. त्यानंतर अन्न व सुरक्षा अधिकारी यांचा अहवाल सुध्दा

प्रकरणात दाखल आहे. तसेच सरकारी वाहनाच्या लॉगबुकचा उतारा सुध्दा प्रकरणात दाखल आहे. त्यानंतर संबंधीत आरोपींच्या विरोधात सबळ पुरावा मिळून आल्याने, मी आरोपींच्या विरोधात न्यायालयात दोषारोपत्र दाखल केले.

**<u>उलट तपासणी आरोपींचे वकील श्री. एन. एन. खिलजी यांचे मार्फत सुरु -</u>**

२. हे म्हणने खरे आहे की तथाकथीत घटनेमधील तथाकथीत आरोपींना मीच पकडले होते व त्या घटनेचा तपास सुध्दा मीच केला होता. हे म्हणने खरे आहे की मी कथीत घटनास्थळावर अन्न सुरक्षा अधिकारी श्री दंदे यांना बोलाविले नव्हते, तर मी अन्न सुरक्षा अधिकारी यांना पोलीस स्टेशनमध्ये बोलाविले होते. हे म्हणने खरे आहे की मी अन्न सुरक्षा अधिकाऱ्यांना कथीत घटनास्थळावरुन फोन व्दारे माहिती दिली. साक्षीदार स्वतः सांगतात की पोलीस स्टेशनमध्ये आल्यावर मी अन्न सुरक्षा अधिकाऱ्यांना पत्र दिले हाते. हे म्हणने खरे नाही की मी कथीत घटनास्थळावरुन अन्न सुरक्षा अधिकाऱ्यांना फोन केला नाही.

३. मी कथीत घटनास्थळावर मुद्देमाल सिल केला होता. त्या सिल ला मी विशेष ओळख (identification) दिली नाही. हे म्हणने खरे नाही की मी कथीत घटनास्थळावर कोणतेही सिल केले नव्हते. हे म्हणने खरे नाही की मी पंचाना कोणतेही सुचनापत्र दिले नव्हते. हे म्हणने खरे नाही की घटनास्थळावर पंचानी पंचनाम्यावर सही केलेली नाही.

४. गुप्त सुचना प्राप्त झाल्याबाबत मी पोलीस स्टेशनला "सा.ना." टाकला होता किंवा नाही हे मला आता आठवत नाही.

**प्रश्न** - शासकिय वाहन घेवून गेल्याबाबतची नोंद तुम्ही पोलीस स्टेशनच्या स्टेशन डायरी मध्ये केली होती काय ?

**उत्तर** - शासकिय वाहन घेवून गेल्याबाबतची नोंद लॉगबुक रजिष्टरला आहे.

५. लॉगबुक रजिष्टर मध्ये अशी नोंद नाही की "गुप्त माहितीव्दारे सुचना मिळाल्यानंतर शासकिय वाहनाने घटनास्थळावर गुटखा जप्ती करीता गेलो". हे म्हणने खरे नाही की कोणतही घटना घडली नाही त्यामुळे मी तशी नोंद लॉगबुक रजिष्टर मध्ये घेतली नाही.

**प्रश्न** - तपासादरम्यान तुम्हाला अशी माहिती मिळाली का की सदरचा गुटखा कोणाचा होता व तो गुटखा कोठे जात होता ?

**उत्तर** - सदरचा गुटखा कोणाच्या मालकीचा होता याची माहिती मला मिळाली नाही. मात्र, तो गुटखा आर्णी येथे पाठविला जात होता.

६. तपासादरम्यान कथीत गुटख्याबाबत मला त्या गुटख्याची/तंबाखूची मालकी कोणाची आहे याबाबत दस्तऐवज प्राप्त झाले नाही. असे घडले नाही की पोलीस स्टेशनमध्ये कथीतपणे आणलेला गुटख्याचे पोते उघडे होते. हे म्हणने खरे नाही की मी पोलीस स्टेशनमध्ये बसून खोटा घटनास्थळ व जप्ती पंचनामा तयार केला. हे म्हणने खरे नाही की मी कोणत्याही प्रकारचा गुटखा जप्त न केल्यामुळे त्याच्या मालकी हक्काबाबतचे दस्तऐवज मी प्रकरणामध्ये दाखल केले नाही. हे म्हणने खरे नाही की मी साक्षीदारांचे बयाण त्यांच्या सांगण्याप्रमाणे नोंदविले नाही. हे म्हणने खरे नाही की आरोपी विरुध्द कोणताही सबळ पुरावा नसतांना खोटा तपास केला व खोटे दोषारोपत्र दाखल केले. हे म्हणने खरे नाही की वरिष्ठांच्या दबावाखाली येवून खोटा तपास केला व खोटे दोषारोपत्र दाखल केले. हे म्हणने खरे नाही की मी आज खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास संपला.**

**फेरतपास–काही नाही.**

**श्रवणोत्तर स्वीकृत**

(पी.एस.इंगळे)
अतिरिक्त सत्र न्यायाधीश, यवतमाळ.

दिनांक – ०६/०७/२०२६